# महाराष्ट्र शासन
## शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण
**१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे ४११ ००१**

Email Id – jdpunescholarship@gmail.com Website – www.jdhepune.info

फोन नं ०२०-२६१२७८३३ / २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२


जा.क्र. महाडीबीटी-२०२३-२४/(८४७३५०-२३)/शिष्यवृत्ती शाखा/ ४३०७ दिनांक : २१.०३.२०२४

**तात्काळ/अत्यंत महत्वाचे**

प्रति,

१. प्राचार्य,
सर्व अशासकीय अनुदानित /विना अनुदानित
कायम विना अनुदानित वरिष्ठ महाविद्यालये,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा
तसेच केंद्रशासित प्रदेश दादरा नगर हवेली.

२. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
३. कुलसचिव, डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर संस्था, पुणे.
४. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.
५. कुलसचिव, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे.
६. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.
७. कुलसचिव, श्रीमती नथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई.
८. कुलसचिव, कवि कुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक.

**विषय : - शिष्यवृत्ती योजनांची सन २०२३-२४ करीता महाडीबीटी पोर्टलद्वारे ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी करणेसाठी महाविद्यालय / संस्था / विद्यापीठ यांनी त्यांचे विविध अभ्यासक्रमनिहाय विविध शुल्क यांबाबतची माहिती आणि प्रोफाईल अद्ययावत करणेबाबत.**

संदर्भ : - १. मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. उशिसं/शिष्य-२०२३-२४/डीबीटी/फी मंजूरी दि. ०५.१०.२०२३.
२. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांचे पत्र क्र. शै. प्रवेश /४२३२ दि. १४.१०.२०२३.
३. प्रस्तुत कार्यालयाचे परिपत्रक क्र. महाडीबीटी-२०२३-२४/(८४७३५०-२३)/शिष्यवृत्ती शाखा/ १४९२३६ दि. २०.१०.२०२३.
४. प्रस्तुत कार्यालयाचे परिपत्रक क्र. महाडीबीटी-२०२३-२४/(८४७३५०-२३)/शिष्यवृत्ती शाखा/ ३३४१ दि. ३०.१०.२०२३.
५. प्रस्तुत कार्यालयाचे परिपत्रक क्र. महाडीबीटी-२०२३-२४/(८४७३५०-२३)/शिष्यवृत्ती शाखा/ ३४९४ दि. ३०.११.२०२३.

उपरोक्त विषयाबाबत शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी त्यांच्या संदर्भामध्ये नमूद केलेल्या पत्रान्वये सन २०२३-२४ या वर्षाकरिता महाडीबीटी पोर्टलवरुन विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे अर्ज भरण्यासाठी त्यांचे महाविद्यालय/विद्यापीठ/संस्था यांचे महाडीबीटी पोर्टलवर प्रोफाईल अद्ययावत करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. **संदर्भिय परिपत्रक क्र. ४ आणि ५ अन्वये या कार्यालयाकडून जिल्हानिहाय** तसेच तालुकानिहाय **कार्यशाळा घेऊन सन २०२३-२४ या वर्षाकरिता महाडीबीटी पोर्टलवर नोंदणी केलेल्या महाविद्यालयांची सर्व अभ्यासक्रमनिहाय फी ॲप्रुवल करण्यात आली आहे.**

अद्यापही या विभागाच्या अधिपत्याखालील काही महाविद्यालयांनी महाडीबीटी पोर्टलवरील सर्व अभ्यासक्रमनिहाय फी ॲप्रुवल केली नाही असे निदर्शनास आले आहे. **तरी ज्या महाविद्यालयांची महाडीबीटी पोर्टलवरील सर्व अभ्यासक्रमनिहाय फी ॲप्रुवल प्रलंबित आहे अशा सर्व महाविद्यालयांनी कृपया दि. २२.०३.२०२४ आणि दि. २८.०३.२०२४ या दिवशी सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग, पुणे कार्यालयात सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत शिष्यवृत्तीचे कामकाज करणाऱ्या कर्मचाऱ्याने सन २०२३-२४ या वर्षाकरिता महाडीबीटी पोर्टलवरील सर्व अभ्यासक्रमनिहाय फी ॲप्रुवल न झाल्याचे सविस्तर कारण पत्रामध्ये नमूद करुन प्राचार्यांच्या स्वाक्षरीने सदर पत्र, विद्यापीठाचे संलग्नीकरण पत्रासह उपस्थित राहून कोणत्याही परिस्थितीत महाडीबीटी पोर्टलवरील सर्व अभ्यासक्रमनिहाय फी ॲप्रुवल करुन घ्यावी.** दि. ३१.०३.२०२४ ही महाडीबीटी पोर्टलवर विद्यार्थ्यांकरीता ऑनलाईन ॲप्लिकेशन करण्यासाठी अंतिम मुदत आहे. त्यापूर्वी सर्व विद्यार्थ्यांनी योजनानिहाय ऑनलाईन ॲप्लिकेशन करुन त्यांचे ऑनलाईन ॲप्लिकेशनची स्क्रूटिनी महाविद्यालय आणि विभाग स्तरावर दि. ३१.०३.२०२४ पूर्वी करणे अत्यावश्यक आहे. तरी सदर विषयाचे गांभीर्य विचारात घेऊन सन २०२३-२४ या वर्षाकरिता महाडीबीटी पोर्टलवरील ज्या महाविद्यालयांची सर्व अभ्यासक्रमनिहाय फी ॲप्रुवल झालेली नाही अशा सर्व महाविद्यालयांनी / संस्थांनी / विद्यापीठांनी कृपया उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे उपस्थित राहून फी ॲप्रुवल करुन घ्यावी.

सन २०२३-२४ या वर्षाकरिता महाडीबीटी पोर्टलवरील ज्या महाविद्यालयांची सर्व अभ्यासक्रमनिहाय फी ॲप्रुवल न झाल्यामुळे कोणत्याही महाविद्यालयातील एकही विद्यार्थी ऑनलाईन ॲप्लिकेशन न करु शकल्यामुळे शिष्यवृत्ती योजनेच्या लाभापासून वंचित राहिल्यास त्याकरिता संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य / विद्यापीठाचे कुलसचिव जबाबदार राहतील याची सन २०२३-२४ या वर्षाकरिता महाडीबीटी पोर्टलवरील ज्या महाविद्यालयांची सर्व अभ्यासक्रमनिहाय फी ॲप्रुवल न झालेल्या महाविद्यालयांनी / संस्थांनी / विद्यापीठांनी नोंद घ्यावी.

आपला विश्वासू

**(डॉ. केशव तुपे)**
सहसंचालक, उच्च शिक्षण,
पुणे विभाग, पुणे

प्रत - मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे ४११००१ यांना माहितीस्तव सविनय सादर.